# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. ३१० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०६/२०१८

**१) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/०६/२०१८ चे १२.३० ते १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. ५ याने फिर्यादीचा मुलगा राहुल वय २० वर्ष, याचे सोबत भांडण करुन मारपीट केले व त्यानंतर १८.०० वाजता दरम्यान आरोपी क्र. १ ते ५ यांनी फिर्यादी ही पती सोबत मोटार सायकलने घरी जात असतांना रस्त्यात अडवुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीस ओढुन लाथाबुक्यांने मारपीट केली व तुझ्या पोराने माझे बापाला मारले असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व आरोपी क्र. ३ व ४ यांनी सुध्दा फिर्यादीचे केस ओढुन मारपीट केली आरोपी क्र. ५ ने मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीं सुनिता नामदेव दोनोडे वय ४० वर्ष, रा. रनाळा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,३४१,३२३,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत

**२) कपाळावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/०६/२०१८ चे १२.३० ते १८.०० पर्यत यातील आरोपीने फिर्यादीचे घरी जावुन वाहीताचे १५००/—रु. मला दे तेव्हा फिर्यादीने आरोपीस मी वेगळी राहते तुम्हाला १५००/—रु. कशाचे देवु अशी म्हणाली असता आरोपीने शिवीगाळ करुन अंगनातील प्लॉस्टीकची बकेट फिर्यादीचे कपाळावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी सौ. माया विजय पंचवटे वय ३५ वर्ष, रा. बारव्हा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बागडे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत

**३) चारचाकी गाडीच्या धडकेत एकास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १७/०६/२०१८ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील जखमी आनंद रामकृष्ण तरकरदेसाई वय २६ वर्ष, रा. महालगांव हा ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ५४७२ मध्ये डिझेल टाकुन डिझेलचे पैसे घेण्या करिता ट्रॅक्टर समोरुन जात असतांना यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील चार चाकी गाडी निष्काळजीपने चालवुन आनंद तरकरदेसाई यास मोदी पेट्रोलपंप साकोली येथे धडक मारुन त्याचे दोन्ही पायाला धडक मारुन त्याचे दोन्ही पायाला गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी दिनेश रामनिवास मोदी वय ५४ वर्ष, रा. पेट्रोलपंप साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) कपडा दुकानाला आग लागुन जळुन सामानाची नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०३/०६/२०१८ चे रात्री ०१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे पती पत्नी असुन त्यांचे मध्ये पटत नसुन ते वेगवेगळे राहतात यातील फिर्यादीचे कपडा दुकानात मध्ये आगी व्द्रारे ८ ते ९ लाख रुपयाचे कपडे, भांडे जळाल्याने सदर आग यातील संशयीत आरोपीने लावली असावी असे फिर्यादीने संशय व्यक्त करीत असल्याने फिर्यादी सौ. मालती प्रकाश वाघमारे वय ३८ वर्ष, रा. पांढराबोडी यांचे तोंडी रिपोर्ट व चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४३५ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खोकले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन पाटीने डोक्यावर व विटाने हाताचे मोंडयावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/०६/२०१८ चे १९.३० वाजता दरम्यान यातील दिनांक १६/०६/२०१८ ला १८.३० वाजता दरम्यान फिर्यादी व फिर्यादीचा मित्र ~~मित्र~~ आरोपी क्र. १ हे एकाच मोटार सायकलने आमगांव येथे गेले व आमगांव येथे आरोपीने फिर्यादीला मी तुझा १ महिन्या पासुन शौक पुरा करित आहे याच कारणावरुन यातील आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ ने लांबाझोबी केली व आरोपी क्र. २ याने पाटीने डोक्यावर व विटाने उजवे हाताचे मोंडयावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

६) संगनमत करुन काठीने व थापड बुक्यांनी मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १६/०६/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी चे घरी छपरीत जावुन फिर्यादीचे पती मंगेश कडव यास तु माझ्या मानसाला का मारलास? असे म्हणुन आरोपी क्र.१ ने काठीने छातीवर, पाठीवर, पोटावर, डोक्याचे डावे बाजुला मारुन आरोपी क्र. २ ने थापडबुक्यांने मारुन जखमी केल्याने फिर्यादी सौ. संतोषी मंगेश कडव वय २९ वर्ष, रा. आमगांव यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५२,३२३,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

७) क्षुल्लक कारणावरुन डोक्यावर खाली पव्व्याने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १६/०६/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी मधुकर माहादेव शेंद्रे वय ५० वर्ष, रा. चितापुर हमु आमगांव/दिघोरी हा काम करित असलेल्या बंद दुकानाचे झोपडीत आराम करीत असता यातील आरोपीने फिर्यादीस पाणी का देत नाही या कारणावरुन डोक्यावर दारुचा खाली पव्व्याने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

८) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १४/०६/२०१८ चे १२.०० ते १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष, ८ महिने हिला यातील संशयीत आरोपीने फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

९) अल्पवयीन मुलाला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १७/०६/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा वय १५ वर्ष, हा आज रोजी सकाळी गणेशपुर येथे बाजारात वडीलाचे फुट दुकानात जातो म्हणुन घरुन निघाला परंतु दुकानात व घरी पोहचला नाही त्याचा शोध केला मिळुन आला नाही अल्पवयीन बालकास कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

१०) फेसबुकवर अश्लिल फोटो पोस्ट करुन लोकांचे श्रध्दांचे भावना दुखावल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १५/०६/२०१८ चे १६.०१ वाजता दरम्यान यातील आरोपीने हेतुपरस्पर व दृष्ट बुध्दीने त्याचे फेसबुकवर खात्यावरुन मुश्लीम धर्माविरुध्द अश्लिल मॅसेज पोस्ट करुन तसेच मुस्लीम धर्मीयांचे पवीत्र धार्मीक स्थळावर नग्न स्त्रियांचे अश्लिल फोटो पोस्ट करुन मुश्लीम धार्मीक लोकांचे श्रध्दांना अपमान करुन धार्मीक भावना दुखावल्या आहेत अशा फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे. कलम २९५(अ) भादंवि. सहकलम मा. तं. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. मानकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

११) अवैध हातभट्टी व देशी दारु अडड्यांवर धाडी . :–

दिनांक १७/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा व सिहोरा येथे हातभट्टी व देशी दारु अड्डयावर धाडी घालुन ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ८५ लिटर हातभट्टी दारु + ८८० किलो सडवा मोहा+ साहीत्य किंमती ५५,५५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.